# उ प सं हा र

# उ प सं हा र

गौरी देशपांडे यांच्या कथात्म लेखनाच्या विशेषांचा विचार करणे हा प्रस्तुत प्रबंधाचा उद्देश आहे. गौरी देशपांडे यांच्या कथात्म वाड्.मयाचे स्वरूप पाहिल्यावर सकृत दर्शनी जाणवलेली बाब म्हणजे गौरी देशपांडे यांनी जरी त्यांच्या साहित्यकृतींचा कादंबरी म्हणून उल्लेख केलेला असला तरी त्या त्या साहित्यकृतींचे स्वरूप लक्षात घेता त्या कादंबरी नसून कथाच आहेत. असे लक्षात येते म्हणून,

प्रस्तुत प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये प्रथम कथा या वाड्.मयप्रकाराच्या स्वरूपाची वैशिष्टये विशद केली आहेत. कथा आणि कादंबरी, लघुकथा, दीर्घकथा, लघुकादंबरी, कादबरी यांच्यातील रूपभेदा संबंधी भालचंद्र नेमाडे यांनी केलेली मिमांसा ग्राहय मानून विवेचन केले आहे.

कथा या वाड्.मय प्रकाराचे विशेष सांगून कथेच्या रूपाच्या प्रमुख घटकांचे विवेचन केले आहे. कथानक, आशयसूत्रे, व्यक्तिचित्रणे, वातावरण, निवेदन तंत्र, आणि भाषा या घटकांचे विस्ताराने विवेचन करून गौरी देशपांडे यांच्या कालखंडापर्यंतच्या मराठी कथेच्या विकासाचा धावता आढावा घेतला आहे. त्यामध्ये विशेषत: १९६० नंतर बदललेल्या कथेच्या रूपाचे विस्ताराने विवेचन करून १९६० नंतरच्या प्रमुख कथा लेखिकांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये गौरी देशपांडे यांच्या कथात्म वाड्.मयातील आशयसूत्रांच्या स्वरूपाविषयी विवेचन केले आहे.

मानवी संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासात पुरुषप्रधान, पितृसत्ताक समाज व्यवस्थेतील स्त्रीजीवनाचे चित्रण विविध वाड्.मयकृतींमध्ये झालेले दिसते. स्त्री आणि पुरुष यांच्यात नैसर्गिकदृष्टया असलेल्या शारीररचनाभेदामुळे त्या

दोघामध्ये फरक करुन स्त्रीला दुर्बल ठरवून तिचा दर्जा दुय्यम मानला गेलेला दिसतो. पुरुष लेखकांनी स्त्रियांच्या दु:खाचे, समस्यांचे पारंपरिक दृष्टिकोनातून चित्रण अनेक साहित्यकृतींतून केलेले दिसते. मात्र स्त्रियांनी रेखाटलेले, स्त्रियांचे दु:ख, त्यांच्या समस्या, त्यांचे अनुभवविश्व यांचे ज्वलंत चित्र व वास्तवदर्शी प्रखरता पाहण्यासाठी मराठी वाचकाला विभावरी शिरुरकरांच्या "कळयांचे नि:श्वास" पर्यंत वाट पहावी लागली.

दुस-या महायुध्दानंतर संपूर्ण जगाचाच कायापालट झाला. त्याचा परिणाम म्हणून अपरिहार्यपणे स्त्रियांच्या जीवन जगण्याच्या पध्दतीतही प्रचंड प्रमाणात बदल झालेला दिसतो. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी या सारख्या बलाढ्य व प्रगत राष्ट्रात देखिल स्त्रियांवर अन्याय व अत्याचार होत होतेच. परंतु दुस-या महायुध्दानंतर स्त्रीमुक्ती चळवळीने प्रचंड वेग घेऊन, स्त्रीलाही माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त करुन देण्यासाठी युध्द पातळीवर संघर्ष सुरु केला. त्याचे पडसाद भारतासारख्या देशातही उमटले. स्वाभाविकपणेच ते महाराष्ट्रात आणि मराठी वाङ्मयातही उमटले.

१९६० नंतरच्या मराठी वाङ्मयातील स्त्रीने लिंगभेद विरहित समाजव्यवस्थेची कल्पना मांडून आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील पुरुषाचे वर्चस्व धुडकावून लावलेले दिसते. तसेच पुरुषाचा, पुरुषप्रधान संस्कृतीचा व समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा परंपरागत चालत आलेल्या संकुचित दृष्टिकोणाचा पुरुषावर व स्त्रीवर कसा विपरित परिणाम झाला याचे चित्रण केले. पुरुषाच्या दृष्टिने असलेले बाईपण नाकारले. बाईपणाशी निगडीत असलेल्या नैतिक कल्पना नाकारल्या. मात्र स्त्रीला व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा देण्याचा यशस्वी प्रयत्न या कालखंडात झालेला दिसतो. या लेखनामध्ये कमल देसाई, अंबिका सरकार, पद्मजा फाटक, गौरी देशपांडे यांचे लेखन विशेष उल्लेखनिय आहे.

गौरी देशपांडे यांनी स्त्रीला केंद्र कल्पून आपले कथालेखन केलेले आहे. १९७० पासून सातत्याने त्यांनी लेखन केले. त्यांच्या एकंदर कथात्म साहित्यातील स्त्रीची व्यक्तिरेखा वैशिष्ट्यपूर्ण आहे. इतर मराठी कथांतून भेटणाऱ्या स्त्रियांपेक्षा अगदी वेगळ्या वृत्तीची, आधुनिक मनाची, सुशिक्षित, आधुनिक व तर्कशुध्द विचार करणारी, मुळात मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेली परंतु कालमानानुसार हळूहळू उच्च मध्यमवर्गीय समाजाच्या वर्तुळात वावरू लागलेली अशी ही स्त्री आहे. स्वतंत्र व मुक्त जीवन जगू इच्छिणारी ही स्त्री गौरी देशपांड्यांच्या लेखनातून समर्थपणे प्रकट होते. असे अनुभवाचे वेगळेपण असल्यामुळे त्यांच्या कलाकृतींमधील आशयसूत्रही वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण असतात.

लेखक कथेसारख्या माध्यमातून व्यक्ती, समाजजीवन, वातावरणयांनी तयार होणारी सुसंबध्द रचना करीत असतो. अर्थपूर्ण वाटणारा, विशेषत्वाने जाणवणारा जीवनातला एखादा भाग, एखादा अनुभव त्याला आपल्या कलाकृतीतून आविष्कृत करावयाचा असतो. त्यात त्याला अर्थपूर्ण जीवनाचे अनेक पैलू उलगडून दाखवायचे असतात. लेखकाला अभिप्रेत असलेला जीवनार्थ म्हणजे त्याच्या साहित्यकृतीचे आशयसूत्र. जीवनानुभव जेवढे गुंतागुंतीचे तेवढीच आशयसूत्रे गुंतागुंतीची असतात. आशयसूत्रे ही प्रधान तशीच गौण असू शकतात. कधीकधी ती समांतर असू शकतात. या आशयसूत्रांचा अधिकाधिक विकास करण्यासाठीच लेखक प्रयत्नशील असतात. गौरी देशपांडे यांच्या कथेतही याचा प्रत्यय येतो.

स्त्रीवादी चळवळीने १९६० नंतर सर्वंकष लढयाचे रूप धारण केले. पारंपरिक स्त्रीचे रूढ आडाखे मोडले. विवाह संस्थेला हादरा दिला. अशी स्त्रीवादी भूमिका स्वीकारलेली असल्यामुळे गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यातील आशयसूत्रांना वेगळेपण प्राप्त झालेले दिसते. तसेच उपजत गुण, कौटुंबिक जिव्हाळा, साहित्यिक वातावरण, इंग्रजी शिक्षण, पाश्चिमात्य ग्रंथांचा

अभ्यास, जनप्रवास - तेथील स्वानुभव यांचा गौरी देशपांडे यांच्या विचार घरणीवर परिणाम झाला, स्वाभाविकपणेच त्यांची आशयसूत्रे सधन बनली.

गौरी देशपांडे यांच्या कथात्मलेखनातील आशयसूत्रे :

१) पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील स्त्रीची कुचंबणा :

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील स्त्रीची कुचंबणा होते. तिचे चित्रण हे गौरी देशपांडे यांच्या साहित्यातील प्रमुख आशयसूत्र आहे. त्यांच्या सर्वच कथा वाङ्.मयामध्ये ते आढळते.

२) स्वतंत्र व्यक्तित्वासाठी संघर्ष/मुक्त होण्याची आकांक्षा :

मराठी कथांतून भेटणाऱ्या स्त्रियांपेक्षा अगदी वेगळया स्वभावाची, आधुनिक मनाची स्त्री गौरी देशपांड्याच्या कथांत भेटते.

व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य मानणाऱ्या स्त्रीच्या मनावर नीती-अनीतीच्या पारंपरिक कल्पना, नैतिक संघर्ष, समाजभय, समाजनियमांचा भंग, कुटुंब पध्दतीची आचारसंहिता या कशाचेही ओझे नाही. तिला स्वत:चेही भय नाही. कारण ती स्वत:ला स्वत:पासून लपवत नाही. उलट स्वत:च्या लालसा, वासना, शारीर संवेदना, यांना "ती आहे हे असं आहे" अशा प्रांजळपणे स्विकारते. स्वत:च्या भावनांशी, संवेदनांशी प्रामाणिक राहण्यातच तिची निष्ठा आहे. ती बुध्दीमान आहे, उदार आहे, तर्कशुध्द विचार करणारी आहे, आणि प्रेमाचे मूल्य जाणणारी आहे. साहजिकच वर्तमान समाजामध्ये वावरत असताना तिला झगडावे लागते. हे झगडणे स्वतंत्र व्यक्तित्वासाठी असते. मुक्त होण्यासाठीचे असते. म्हणून हे आशयसूत्र त्यांच्याकथांत ठळकपणे आढळते. पार्श्वभूमीवर स्त्रीच्या कुचंबणेचे चित्रण करुन पुढे संघर्षाचे चित्रण केल्यामुळे या चित्रणाला उठावदारपणा येतो. त्यामुळेच त्यांची नायिका स्वतंत्र व्यक्तित्वासाठी झगडा, संघर्ष किती सबळपणे देते आहे हे त्यांच्या कथांतून दिसते.

३) विवाह संस्थेचे रूप :

सामाजिक जीवनाचे आणि संस्थांचे रूप कथात्म साहित्यामध्ये अपरिहार्यपणे उमटत असते. गौरी देशपांडे यांच्या साहित्यातही याचा पुरेपुर प्रत्यय येतो. स्त्रीवादी चळवळीची जोमाने सुरुवात झाली आणि स्त्रीला माणूस म्हणून जगण्यासाठी तिने संघर्ष सुरु केला. ती शिक्षणाच्या, नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडली. पुरुष वर्गाशी तिचा संबंध येऊ लागला. तिची जीवन जगण्याची पध्दती, तिची नीतीमूल्ये, जीवनमूल्ये बदलू लागली. पारंपरिक मूल्यांना झुगारून देऊन नवीन मूल्ये प्रस्थापित होऊ लागली. त्यामुळे बदलत गेलेल्या, बदलत जाणा-या विवाह संस्थेच्या रूपाचे चित्रण असे एक आशयसूत्र गौरी देशपांडयांच्या कथांत आढळते.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये विवाह संस्थेसारखी संस्था स्त्रीच्या पायात पारतंत्र्याची बेडी कशी घालते आणि तिच्या सामाजिक व मानसिक भावनांना बंधने कशी घालते व या विवाह संस्थेत तिची कुचंबणा कशी होते याचे चित्रण तर त्यांनी केलेलेच आहे. परंतु नव्या विचाराने प्रेरित झालेली स्त्री या विवाह संस्थेला आव्हान कशी देते याचेही चित्रण केले आहे. म्हणून विवाह संस्थेचे प्राचीन रूप आणि भविष्यकालीन रूपाचे वेध घेणारे रूपही त्यांच्या कथांतून दिसून येते. या बदलत्या विवाहसंस्थेचे रूप चित्रित करणे हे त्यांच्या कथात्म लेखनाचे महत्वाचे आशयसूत्र असल्याचे दिसून येते.

४) मानवी नाते संबंधाचे चित्रण :

स्त्रीला केंद्र कल्पून कथा निर्मिती करणा-या गौरी देशपांडे यांच्या कथांमध्ये मानवी नातेसंबंधाची विविध रुपे चित्रित झालेली दिसतात. जेव्हा स्त्री चार भिंतीच्या आतील आपले भावविश्व ओलांडून बाहेर पडते तेव्हा तिचा समाजातील सर्व घटकांशी, सर्व स्तरावरील पुरुष वर्गाशी संबंध येतो. कुटुंबातील व्यक्तींशी तिचे वेगवेगळया प्रकारचे नाते असतेच पती-पत्नी, सासू-सून, आई-मुले,

ननंद-भावजय अशा महत्वपूर्ण नात्यांनी ती कुटुंबाशी बांधली गेलेली असते. जेव्हा ती उंबरठा ओलांडून समाजात वावरते तेव्हा ती समाजाशी वेगवेगळया नात्यांनी बांधली जाते. मैत्रिण-मैत्रिण, मित्र-मैत्रिण, प्रियकर-प्रेयशी, बॉस-सेक्रेटरी अशी विविध नाती निर्माण होतात. या वेगवेगळया नात्यांचे चित्रण लेखिकेने अत्यंत प्रभावीपणे केलेले आहे.

एकूणच, गौरी देशपांडे यांच्या कथात्म वाङ्‌मयातील आशयसूत्रांचा विचार करताना प्रामुख्याने स्त्रीच्या कुचंबणेचे चित्र पार्श्वभूमी दाखल आलेले आहे. त्याचे प्रमाणाही कमी आहे आणि रंगभूमीवरील स्थिर पडद्यासारखे काहीसे त्याचे स्वरूप आहे. या पार्श्वभूमीवर स्वतंत्र व्यक्तित्वासाठीचा संघर्ष करणारी स्त्री चित्रित करणारे आशयसूत्र दिसून येते. यामुळे हया दोन्हीचा अपरिहार्य संबंध म्हणून विवाह संस्थेचा अभिप्राय कथांमधून व्यक्त होताना दिसतो. कारण कुचंबलेल्या स्त्रीचे जीवन आणि पारंपरिक समाजाविरूद्ध बंड व मुक्त होण्याची आकांक्षा या दोन्ही गोष्टी विवाह संस्थेपुढे प्रश्न-चिन्हं उभी करतात. असे घडत असताना बदललेल्या आणि बदलणा-या नाते संबंधाचे चित्रण होणे अपरिहार्य ठरते. किंबहुना अशा नातेसंबंधाचे चित्रण करून एक विशिष्ट असा स्त्रीवादी दृष्टिकोन अभिव्यक्त करण्याचा लेखिकेचा हेतू जाणवतो.

अशाप्रकारे गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यामध्ये वरील चार आशयसूत्रे दिसून येतात. थोडा अधिक बारकाईने विचार केला तर ही वेग-वेगळी आशयसूत्रे नसून एकाच आशासूत्राचे वेगवेगळे पदर आहेत असे म्हणावे लागेल. स्त्रीवादी भूमिकेतून आधुनिक कालातील, मध्यमवर्गीय समाजातील वेशी ओलांडून गेलेल्या व्यक्तींचे जीवनचित्रण असे एक स्वरूप या सर्व लेखनाला असलेले दिसून येते.

गौरी देशपांडे यांच्या साहित्यामध्ये एकाच आशयसूत्राचे विविध पदर दिसून येतात. मात्र त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत हे सर्व पदर एकाच

वेळी नसतात. किंबहूना असे दिसून येते की, त्यांच्या एका साहित्यकृतीमध्ये आशयसूत्राचा एकच विशिष्ट पदर अधिक तीव्रतेने आणि स्पष्टपणे आविष्कृत होतो.

प्रबंधाच्या तिस-या प्रकरणात गौरी देशपांडे यांच्या कथात्म वाङ्.-मयातील व्यक्तिचित्रणे रेखाटलेली आहेत.

आशयसूत्रे व घटना प्रसंगांचे चित्रण हे जसे वैशिष्टयपूर्ण व महत्वपूर्ण घटक असतात. तसेच व्यक्तिचित्रणे हा ही कथा साहित्याचा एक महत्वपूर्ण असा घटक असतो. गौरी देशपांडे यांच्या साहित्यातही स्वाभाविकपणे याचा प्रत्यय येतो.

गौरी देशपांडे यांनी स्त्रीला केंद्र कल्पूनच कथानिर्मिती केलेली आहे. असे असले तरी या कथांत एका विशिष्ट टप्प्यातल्या स्त्रियांचे चित्रण आढळून येते. किशोरवयीन मुली, विशीच्या आतील अल्लड मुली, वृध्द बायांचे चित्रण कुठेही आढळत नाही. परंतु स्त्रियांच्याच व्यक्तिरेखा त्यांच्या कथांत अधिकाधिक ठसठशीतपणे आलेल्या दिसतात. या व्यक्तिरेखांमध्ये कांही बंडखोर स्त्रियांचे चित्रण केलेले आहे. तसेच काही पारंपरिक मूल्ये स्वीकारणा-या स्त्रियांचेही चित्रण केले आहे.

राधा, सुहास, कालिंदी, सोना या बंडखोर स्त्रीयां त्यांच्या कथांतून भेटतात. या बंडखोर स्त्रीयांचे बंड उठून दिसावे म्हणून पार्श्वभूमीदाखल पारंपरिक पध्दतीचे जीवन जगणा-या, कुचंबणा झालेल्या मधुराबाई, वत्सला-बाई, सिंधू, चिमणी यांच्यासारख्या स्त्रियाही भेटतात. तसेच नैसर्गिक सौंदर्यालाच जपणा-या स्त्रियांचे चित्रणही लेखिकेने तटस्थपणे केलेले आहे.

<u>गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यातील पुरुष चित्रणे:</u>

गौरी देशपांडे यांच्या कथात्म लेखनामध्ये भिन्नभिन्न स्वभावाच्या,

भिन्न भिन्न विचारांच्या, भिन्न-भिन्न आचारांच्या व्यक्ती आलेल्या आहेत. पण त्यांच्या कथात्म लेखनाचे विशेष असे की, त्यांनी आपल्या सर्वच कथा स्त्रीला केंद्र कल्पून लिहिलेल्या असल्यामुळे पुरुषांना त्यांच्या कथांमध्ये तितके प्राधान्य मिळू शकत नाही. स्त्रियांचे व्यक्तिचित्र रेखाटत असताना त्या स्त्रीच्या स्वभाव रेखाटन करण्याच्या संदर्भामध्ये जेवढा काळ तो पुरुष आला असेल तेवढेच त्याचे दर्शन.

तरी सुध्दा त्यांच्या कथात्म साहित्याचे अवलोकन केल्यानंतर त्यांच्या कथात्म साहित्यात वेगवेगळया स्वभावाचे, वेगवेगळ्या प्रवृत्तीचे पाश्चात्य संस्कृतीतील काही पुरुषपात्रे आपल्याला भेटतात. त्यामध्ये काही चांगले मित्र म्हणून येतात. काही फसवणारे पुरुषही भेटतात. तर काही पुरुषी वर्चस्व गाजविणारे पुरुषही दिसतात. तर काही जीवलग प्रियकरही आहेत. अशी वेगवेगळी नाती निभावणारे पुरुष त्यांच्या कथांतून भेटतात.

पती-पत्नी हे निर्मळ नाते जोपासणारे पुरुष ही त्यांच्या कथांत भेटतात. आपण असताना आपली पत्नी अन्य पुरुषाशी संबंध ठेवते याकडे समजूतदारपणे पाहणारा, अत्यंत समजूतदार आणि आधुनिक विचारांचा, बायकोचं इतरांच्या प्रेमात पडणं कळू शकणारा, व्यक्तीस्वातंत्र्याच्या आड न येणारा असा समजूत-दार नवरा त्यांच्या कथांत भेटतो.

वयस्क स्नेही, वडीलधारी पुरुष मंडळीही त्यांच्या कथांत येतात. त्यांच्या बहुतेक कथांत एक तरी वडीलधारी व्यक्ती असून तिचा कथेच्या नायिकेवर प्रभाव असतो, तिचे व त्याचे अत्यंत जिव्हाळयाचे संबंध असतात. या लोभसवाण्या नात्यात विश्वास, प्रेम त्याचबरोबर ओढही असते. या ओढीचे उदात्तीकरण न करता त्या चित्रण करताना दिसतात. ही व्यक्ती त्या स्त्रीपेक्षा वयाने बरीच मोठी, वृध्दत्वाकडे झुकणारी असते. या वृध्द मायाळू माणसांना त्या स्त्रीच्या आयुष्यात गाढ स्थान आहे. त्यांचे आणि तिचे हे नाते गूढ आहे.

वात्सल्य, माया, स्नेह आणि शिवाय स्त्री-पुरुषातील उत्कट आकर्षण त्यांच्या संमिश्र छटा या नात्यात रेंगाळताना दिसतात.

गौरी देशपांड्यांनी आपल्या काही कथांमध्ये मी, तो, ती अशी नावे देऊन प्रतिकात्मक पात्रे उभी केली आहेत. नाव न देता उभे केलेले हे पात्र त्याच्या आचार विचारांचे प्रतिनिधित्व करीत असते. अशा प्रकारच्या रचनेने वेगवेगळे परिणाम होतात. एक म्हणजे विशिष्ट विचार ठसठसीतपणे प्रतिबिंबित होतो. पण त्याचबरोबर व्यक्ती भोवतीचा सामाजिक परिसर तोडला जाऊन व्यक्तिचित्रणे अधांतरी बनतात.

शरीर वैशिष्ट्ये, रूप, रंग याच्या प्रमाणेच जात, गोत, धर्म, आर्थिक परिस्थिती, सामाजिक स्थान यासारखे सामाजिक परिस्थितीचे चित्रण लेखिकेने केलेले नाही. भारतीय व्यक्तींचे जीवन हे रूप, रंग, जात, गोत्र, धर्म, समाजातील स्थान, आर्थिक परिस्थितीचे चित्रण या गोष्टींनीच नियमित होत असते. लेखिका आपल्या पात्रांना आडनावही देत नाही. काही व्यक्ती महा-नगरातल्या आहेत. भारतीय महानगरात जात पातीचे बंध थोडे पुसटसे झालेले दिसतात. महानगरातल्या व्यक्ती दगदग, धावपळ, औद्योगिक संस्कृति याचे प्रचंड ताण या व्यक्तींच्या मनावर असतात. त्यामुळे महानगरीय व्यक्तींचे जीवन मर्यादित झालेले असते. कोणाही व्यक्तीचे जीवन हे अवकाशात किंवा पोकळीमध्ये होत नसते, तर ते एका विशिष्ट सामाजिक चौकटीतच आकाराला येत असते. पण लेखिका आपल्या व्यक्ती रेखाटताना याचे भान राखत नाही. त्यामुळे त्यांच्या व्यक्ती या मुळे नसलेल्या वाटतात. त्यांच्या कथांतील बंडखोर स्त्रीचे बंड तितके परिणामकारक होत नाही. याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. असे म्हणावे लागेल.

गौरी देशपांडे यांच्या लेखनात लहान मुलांबाळांचे चित्रण आणि वृध्दत्वाने गलितगात्र झालेल्या अत्यवस्थ व्यक्तींचे चित्रणही येत नाही. खरे

तर कथात्म साहित्य हे समाज जीवनाची अनुकृती असते, यथावत दर्शन घडवित असते. त्यांच्या कथा प्राधान्याने कुटुंबकथा आहेत. पती, पत्नी, मुले, पतीचे मित्र, पत्नीचे मित्र अशा व्यक्ती मिळून या कथा सिध्द होतात. म्हणून या कुटुंब कथा आहेत. पण महाराष्ट्रीय समाजात आज जरी विभक्त कुटुंबपध्दती असलेली दिसत असली तरीही वृध्द माणसे या कुटुंबात असतातच. "वृध्दाश्रम" ही संस्था महाराष्ट्रात फारशी प्रचलित नाही. त्यामुळे सर्वसाधारण कुटुंबात आजी-मुलगी-नात, आजोबा-मुलगा-नातू अशा तीन पिढया दिसून येतात. असे हे महाराष्ट्रीय समाजातील कुटुंबामध्ये असलेले वातावरण त्यांच्या कथांत चित्रित होत नाही. म्हणून त्यांच्या कथांना महाराष्ट्राच्या कुटुंबकथा असे म्हणता येणे कठीण आहे.

मराठीतील या पूर्वीच्या कथांमध्ये प्रेमळ आई, त्यागी बहीण, हक्क गाजविणारे वडील, अधिकार गाजविणारा नवरा, छळ करणारे सासू-सासरे व इतर मंडळी अशा प्रकारच्या व्यक्तिरेखा आढळतात. परंतु गौरी देशपांडयांच्या कथांतील व्यक्तींची स्वभावचित्रे मात्र पारंपरिक कथांपेक्षा वेगळी असलेली दिसतात.

प्रबंधाच्या चौथ्या प्रकरणामध्ये गौरी देशपांडे यांच्या कथात्म लेखनाची निवेदनपध्दती व भाषा या विषयी विवेचन केले आहे.

लेखक लेखनामध्ये कोणत्या ना कोणत्या निवेदनपध्दतीचा अवलंब करीत असतो. तृतीयपुरुषी निवेदनपध्दती, प्रथमपुरुषी निवेदनपध्दती, पत्रे-रोजनिशी अशा तीन निवेदनपध्दती आढळतात. गौरी देशपांडे यांनी आपल्या कथात्म लेखनाच्या आशयाच्या गरजेनुसार आवश्यक व परिणामकारक निवेदनपध्दतींचा अवलंब केलेला दिसतो.

निवेदनपध्दती प्रमाणेच "भाषा" हा ही कथेचा प्रमुख घटक आहे. तो एका अर्थाने निवेदनाचाच घटक ठरतो. लेखकाला अभिप्रेत असलेला अर्थ तो भाषे-तूनच व्यक्त करीत असतो, म्हणून भाषा महत्वाची ठरते.

शब्दांचा साधा, सरळ, सांकेतिक अर्थ पोहोचविणे, टीका, टिंगल, उपहास करणे, कथानक पुढे सरकविणे, मार्मिकपणे भाष्य करणे अशाप्रकारचे काम भाषेलाच करावे लागते. त्यासाठी निवेदनाची भाषा ही महत्वाची असते. ही भाषा जर प्रमाण भाषा असेल व ती निर्देशित असलेल्या वाचक समूहाला मान्य असेल तरच तिच्यात गुणवत्ता निर्माण होते.

गौरी देशपांडे यांच्या कथात्म लेखनाची भाषाही प्रमाणभाषा आहे आणि यात व्याकरणिक नियमावलीच्या शृंखलेचा (कर्ता → कर्म → क्रियापद) क्रम बदलून आशयानुरुप भाषेचा वापर केलेला दिसतो. या बदलाचा चांगला परिणाम होऊन कथेत आकर्षकता निर्माण होते व वाचकाला कथेच्या ओघात सामिल करुन घेण्याच्या दृष्टीने निवेदनाच्या भाषेची ही पध्दती उपयुक्त व परिणामकारक ठरलेली दिसते.

संवादाची भाषा ही कथेमध्ये महत्वपूर्ण ठरते. गौरी देशपांडे यांच्या कथांमध्येही संवादाची भाषा महत्वाची आहे. संवादाद्वारे व्यक्तिवैशिष्टये आविष्कृत करणे, व्यक्तींचे स्वभावदर्शन घडविणे, नाटयनिर्मिती करणे, घटना-प्रसंग हुबेहूब डोळ्यासमोर उभे करणे अशी कार्ये साधलेली दिसून येतात. परंतु संवादातील भाषेतून व्यक्तीचे भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक विशेष, तसेच त्या त्या व्यक्तिचे लिंग, वय इ. विशेष व्यक्त व्हावेत अशी अपेक्षा असते. पण ही अपेक्षा गौरी देशपांडयांच्या संवादातून,भाषेतून पूर्ण होत नाही. उलट पात्रांच्या मुखी लेखिकेची भाषा लादली गेलेली असल्यामुळे कथेत कृत्रिमता आलेली दिसते.

.......

## :: संदर्भ ग्रंथ सूची ::


१) करंदीकर गोविंद विनायक – ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ.

२) कुलकर्णी दा.वि. – मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद, स्वाध्याय महाविद्यालय, प्रकाशन, पुणे-३०, प्र.आ. १९७६.

३) कुलकर्णी वा.ल. – मराठी नवकथेचे सामर्थ्य, वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोण, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-३४, द्वि. आ.

४) केतकर श्री.व्यं. – ब्राह्मणकन्या, विहनस प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, १९७६.
विचक्षणा, किर्लोस्कर वाडी, किर्लोस्कर प्रेस, १९३७.

५) खानोलकर गं.दे. – अर्वाचिन मराठी वाङ्मयसेवक प्रथम खंड भाग-२ द्वितियावृत्ती : व्हिनस प्रकाशन 'तपश्चर्या' पुणे.

६) गणोरकर प्रभा – मिळून साऱ्याजणी, संपा. विद्या बाळ, जुलै, १९९२.

७) गाडगीळ गंगाधर – नवकथा : "स्वरूप आणि आक्षेप", खडक आणि पाणी पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-३४ डब्ल्यू.बी. द्वि.आ.

८) टॉलस्टॉय लिओ - फॉर्म ॲज व्हेरिट ॲज कंटेन्ट, नॉव्हेलिस्टस् ऑन द नॉव्हेल, संपा. मिरिअम ॲलॉट, रॉहोज ॲन्ड केगन पॉल, लंडन, पुनर्मुद्रित, १९७७.

९) देशपांडे गौरी - १) आहे हे असं आहे, मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट, १९८६.

२) एकेक पान गळावया, मौज प्रकाशन, मुंबई, द्वि.आ., १९८५.

३) तेरुओ आणि कांहि दूरपर्यंत, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८५.

४) निरगाठी आणि चंद्रिके ग सारिके ग, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. नोव्हेंबर,१९८७.

५) दुस्तर हा घाट आणि थांग, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. जुलै, १९८९.

६) मुक्काम, मौज प्रकाशन, मुंबई प्र.आ.,१९९२.

७) गोरखची गोष्ट, नानींची नवलकथा, मौज प्रकाशन, मुंबई, दिवाळी (मौज), १९९२.

१०) ओ. मा. पवार व म. द. हातकणंगलेकर - संपा. "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप", (कादंबरी - भालचंद्र नेमाडे.) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८६.

११) फडके ना.सि. - प्रतिभा साधन, दा.ना.मोघे, स्कूल ॲन्ड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर, द्वि.आ. १९३८.

१२) फडके भालचंद्र - मराठी लेखिका चिंता व चिंतन, श्री विद्या प्रकाशन, पुणे-४११ ०३०, प्र.आ. १९८०.

१३) फील्डिंग हेन्री - अेपीस्टोलरी मेथड इम्प्रोवर, नॉव्हेलिस्टस् ऑन द नॉव्हेल, संपा. मिरिअम अॅलॉट, रॉहोज अॅन्ड केगन पॉल, लंडन, पुनर्मुद्रित, १९७७.

१४) मर्ढेकर बा.सि. - सौंदर्य आणि साहित्य, मौज प्रकाशन, मुंबई-४, चौथी आवृत्ती.

१५) रिचर्डसन् सॅम्युअर - लेटर्स मच मोअर लाइव्हली अॅन्ड अफेक्टिंग, नॉव्हेलिस्टस् ऑन दि नॉव्हेल, संपा. मिरिअम अॅलॉअ रॉहोज अॅन्ड केगन पॉल, लंडन, पुनर्मुद्रित, १९७७.

१६) शिरुरकर विभावरी - कळ्यांचे निःश्वास, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण, १९३४.
हिंदोळ्यावर, पॉप्युलर प्रकाशन, मुबई, पुनर्मुद्रण.

१७) सरवटे वि.स. - गोष्टी व लघुकथा, मराठी साहित्य समालोचन, १८१८ - १८३४, इंदुर, १९३७.

........

टीप – प्रस्तुत प्रबंधासाठी याही संदर्भग्रंथाचा अप्रत्यक्षपणे उपयोग झाला.


१) अदवंत म.ना. – प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,
आवृत्ती सहावी, १९८६.

२) शोवडे इंदुमती – मराठी कथा :उद्गम आणि विकास,
सोमया पब्लिकेशन, प्रा. लि. मुंबई, १९७३.

३) हातकणंगलेकर म.द.– मराठी कथा रूप आणि परिसर,
सुपर्ण प्रकाशन, पुणे,
आवृत्ती पहिली, १९८६.

४) देशपांडे अ.ना. – आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास,
भाग पहिला : १८७४ ते १९२० : पुनर्मुद्रण १९७४.
भाग दुसरा : १९२० ते १९५० : पुनर्मुद्रण १९७०.
व्हीनस प्रकाशन, "तपश्चर्या", पुणे ३०.

५) सोमण अंजली – साहित्य आणि सामाजिक संदर्भ : प्रतिमा प्रकाशन,
पुणे-४११ ०३०, प्रथमावृत्ती, १९८९.

६) धोंगडे रमेश – मराठी भाषा आणि शैली ; दिलीपराज प्रकाशन,
धोंगडे अश्विनी पुणे, द्वितीयावृत्ती १९९१.

७) नियतकालिके १) – "मैत्र", द्वैमासिक. ऑगस्ट १९९१ : मराठी कथा शताब्दी
व मराठी नवकथा सुवर्णमहोत्सव विशेषांक,
गोमंतक मराठी अकादमी, पणजी गोवा.
२) – "ललित" : मार्च १९८१. "दशकातील साहित्यिक १९७७ ते ८०"
लेखक - अंजली कीर्तने


.......